आसन क्रमांक १ --------- (आणखी असल्यास) आसन क्रमांक २ --------- आसन क्रमांक ३ ---------

# पुणे विद्यापीठ
## संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग
## प्रवेशपरीक्षा २०१० : सामाइक लेखी परीक्षा

**रविवार, २० जून २०१०** **वेळ :** तीन तास **एकूण गुण :** १००

---

**सूचना :** ही प्रश्नपत्रिका मराठीत आहे. प्रश्नांची उत्तरे मराठीतूनच लिहावी लागतील. आपण इंग्रजीतून उत्तरे लिहिणार असाल, तर इंग्रजी प्रश्नपत्रिका मागून घ्या. This is Marathi language version of the question paper. You will have to answer it in Marathi ONLY. If you wish to answer in English, ask for English version.

* या प्रश्नपत्रिकेचे दोन भाग आहेत. भाग १ ची प्रश्नपत्रिका प्रथम देण्यात येईल.
* भाग १ मधील प्रश्नांची उत्तरे प्रश्नपत्रिकेत दिलेल्या कोऱ्या जागेत लिहावयाची आहेत.
* भाग १ पूर्ण केल्यावरच भाग २ ची प्रश्नपत्रिका देण्यात येईल.
* भाग १ ची प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी एका तासाहून जास्त वेळ लावू नये, असा आपल्याला सल्ला आहे.

---

### भाग – १ (गुण ५०)

**प्रश्न १) पुढीलपैकी कोणत्याही १५ प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(१५)**

१) फेसबुकचे संस्थापक ---------------------------------------------------

२) एकट्याने जगाची सागरी सफर पूर्ण करणारा भारतीय नौदल अधिकारी ---------------------------

३) पुण्याच्या आयपीएल संघाचे नाव ---------------------------------------------

४) माओवाद्यांच्या हक्कांचे समर्थन करणारे प्रसिद्ध साहित्यिक ---------------------------------

५) ‘सार्क’चा सदस्य देश कोणता– मालदीव की मॉरिशस? ---------------------------------

---

**For office use only**

| Q. 1 (15) | Q. 2 (10) | Q. 3 (10) | Q. 4 (5) | Q. 5 (5) | Q. 6 (5) | Total (50) | Examiner’s Signature |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

६) रॉबिन सोडर्लिंग कोणत्या खेळाशी संबंधित आहेत? ----------------------------------------

७) नुकत्याच झालेल्या विमान अपघातात कोणत्या देशाचे अध्यक्ष मृत्युमुखी पडले? -----------------------

८) कोणत्या महिन्यात जागतिक पर्यावरणदिन साजरा केला जातो?-----------------------------------

९) 'दिल्ली मेट्रो'चे शिल्पकार म्हणून कोणाचा उल्लेख केला जातो? -----------------------------------

१०) नजमा हेपतुल्ला या संसदेच्या कोणत्या सभागृहाच्या सदस्य होत्या?--------------------------------

११) केंद्र सरकारचे दूरसंचार खात्याचे मंत्री कोण? ------------------------------------------

१२) 'ब्लॅकबेरी' म्हणजे काय? ---------------------------------------------------

१३) 'जोगवा' चित्रपटातील अभिनयाबद्दल राष्ट्रीय पुरस्कार मिळालेला कलाकार --------------------------

१४) अलमट्टी धरण कोणत्या नदीवर बांधले आहे? ------------------------------------------

१५) गणेश चतुर्थी हिंदू पंचांगानुसार कोणत्या तिथीला साजरी केली जाते? ------------------------------

१६) गुजरातमध्ये नॅनोचे उत्पादन सध्या कोठे होते? ------------------------------------------

१७) झारखंड हे कोणत्या राज्यापासून वेगळे करण्यात आले? -------------------------------------

१८) कतरिना, फियान, लैला, फेत इत्यादी कशाची नावे आहेत?----------------------------------

१९) बराक ओबामा यांच्यापूर्वी अमेरिकेचे अध्यक्ष कोण होते? -----------------------------------

२०) $E = MC^2$ हे समीकरण प्रथम कोणी मांडले? --------------------------------------

**प्रश्नः २) भाषिक कौशल्ये** **(१०)**

१) पुढीलपैकी **कोणत्याही दोन** वाक्प्रचारांचा अर्थ सांगून त्यांचा वाक्यात उपयोग करा. (२)

**क)** काट्याचा नायटा होणे -------- ---------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

**ख)** दाती तृण धरणे ------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------

**ग)** धूळ चारणे -------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------

**घ)** मनात मांडे खाणे ---------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------

२) पुढीलपैकी **कोणत्याही दोन** शब्दांसाठी **प्रत्येकी दोन** समानार्थी शब्द द्या. (२)

**क)** कैफ ------------------------------------------------------------------

**ख)** खेळखंडोबा -------------------------------------------------------------

**ग)** तरणोपाय --------------------------------------------------------------

**घ)** निरामय ---------------------------------------------------------------

**३)** पुढीलपैकी **कोणत्याही चार** शब्दांसाठी **प्रत्येकी एक** विरुद्धार्थी शब्द द्या. (२)

**क)** कोरडवाहू -------------------------- **ख)** खंड ------------------------

**ग)** गाफील ---------------------------- **घ)** गोषवारा --------------------

**च)** जंगम ----------------------------- **छ)** पाखंडी ---------------------

४) पुढील वाक्यांमध्ये शुद्धलेखन, व्याकरण व विरामचिन्हे यांच्या काही चुका आहेत. सर्व वाक्ये अचूक लिहून काढा व मूळ वाक्यांतील ज्या शब्दांमधील चूक दुरूस्त केली असेल अशा शब्दांखाली रेघ ओढा. शब्दांची भर घालू नका किंवा शब्द गाळूही नका, तर फक्त चुकीच्या शब्दांच्या / चिन्हांच्या जागी अचूक शब्द / चिन्ह लिहा. (४)

१) सट्टेबाजांनी काँग्रेस पुरस्क्रुत अपक्ष उमेदवारांना विजय सावंत याला सवार्धिक पसंती दिली आहे.

---

---

२) काही संगीततज्ञांनी गुरूवारी नव्या रागच्या विविधपैलूंच्या प्रसारासाठी समारंभ आयोजित केला आहे.

---

---

३) राज्यपाल के. शंकरनारायण पुढे म्हणाले की, ''ग्रामीण भागातील व्यक्तिंचे आरोग्यमान उंचविण्यासाठी निर्मलग्रामच्या बरोबरीने त्यांना शुद्ध पाणी पुरविणे आवश्यक आहे!''

---

---

४) मानवी शरीरात रोपण करणाजोग्या यकृताची प्रयोगशाळेत निर्मिती येत्या पाच वर्षात शक्य आहे? लंडनमधील संशोधकानी हा दावा केला आहे.

---

---

**प्रश्नः ३) पुढीलपैकी कोणतेही पाच कोण / काय आहेत व ते अलीकडच्या काळात बातम्यांमध्ये का होते ते सुमारे २० शब्दांत स्पष्ट करा. (१०)**

१) दंतेवाडा

---

---

---

२) ममता बॅनर्जी

३) शोएब मलिक

४) सुनंदा पुष्कर

५) विश्वनाथन आनंद

६) थ्री जी स्पेक्ट्रम

७) उज्ज्वल निकम

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

८) वॉरेन अँडरसन

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

९) शिबू सोरेन

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

**प्रश्नः ४) पुढील जोड्या जुळवा. प्रश्नाखाली दिलेल्या जागेतील आकड्यांपुढे योग्य जोडीचे निर्दशक अक्षर लिहा. जोड्या दर्शवणाऱ्या रेघा ओढू नका. तशा रेघा ओढल्यास उत्तराला शून्य गुण देण्यात येतील. (५)**

| | |
|---|---|
| i) सबसे तेज | a) केरळ पर्यटन |
| ii) जय जवान, जय किसान | b) इंदिरा गांधी |
| iii) इंडिया शायनिंग | c) भारत पर्यटन |
| iv) गॉड्स ओन कंट्री | d) रेडिओ मिर्ची |
| v) गरिबी हटाव | e) आज तक |
| vi) अतुल्य भारत | f) अमूल |
| vii) जर्नालिझम ऑफ करेज | g) १९४२चे आंदोलन |
| viii) इट्स हॉट | h) भारतीय जनता पक्ष |
| ix) अटरली बटरली डेलिशियस | i) इंडियन एक्स्प्रेस |
| x) चले जाव | j) लालबहादूर शास्त्री |

i) ---- ii) ---- iii) ---- iv) ---- v) ---- vi) ---- vii) ---- viii) ---- ix) ---- x) ----

**प्रश्न ५) पुढीलपैकी कोणत्याही पाच लघुरूपांचे पूर्ण रूप द्या.** **(५)**

***(सूचना :*** *ही उत्तरे तुम्ही देवनागरी किंवा रोमन लिपीत लिहू शकता किंवा लघुरूपांची मराठीतील प्रचलित रूपेही देऊ शकता.)*

**1)** AICTE

---------------------------------------------------------------------------

**2)** MCI

---------------------------------------------------------------------------

**3)** MBA

---------------------------------------------------------------------------

**4)** FIFA

---------------------------------------------------------------------------

**5)** RBI

---------------------------------------------------------------------------

**6)** http

---------------------------------------------------------------------------

**7)** ATS

---------------------------------------------------------------------------

**8)** MCOCA

---------------------------------------------------------------------------

**प्रश्न ६) पुढीलपैकी कोणत्याही पाच पारिभाषिक शब्दांचे / संकल्पनांचे एका वाक्यात स्पष्टीकरण करा.** **(५)**

**१)** पर्जन्यजलसंधारण (रेन वॉटर हार्वेस्टिंग)

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

**२)** मूल्यवर्धित कर (व्हॅट)

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

३) सोशल नेटवर्किंग साइट्स

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

४) सर्व शिक्षण मोहीम

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

५) मूळ पेशी (स्टेम सेल)

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

६) फोन-इन कार्यक्रम

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

७) सर्वोत्तम पाच (बेस्ट फाइव्ह)

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

८) चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय)

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

# संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग, सामाइक लेखी परीक्षा २०१०

## विभाग दोन (गुण ५०)

सूचनाः १) ही मराठी प्रश्नपत्रिका आहे. तुम्हाला प्रश्नांची उत्तरे फक्त मराठीतूनच लिहावी लागतील.
२) प्रत्येक प्रश्नापुढे दिलेल्या शब्दमर्यादेकडे विशेष लक्ष द्यावे.
३) व्याकरण व शुद्धलेखन यांकडेही लक्ष द्यावे.

---

**प्रश्न १) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पाचशे शब्दांचा निबंध लिहा. (२०)**

१) देशापुढील अंतर्गत सुरक्षेची आव्हाने
२) फिफा विश्वकरंडकः आफ्रिकेच्या विकासाला चालना
३) पर्यावरण वाचविण्यास विलंब झाला आहे काय?
४) बालवाडी ते पदव्युत्तरपर्यंतच्या शैक्षणिक सुधारणा
५) न्यायाला विलंब म्हणजे न्याय नाकारणेच!
६) महाराष्ट्राची पन्नास वर्षे

**प्रश्न २) खालीलपैकी कोणत्याही चार विषयांवर प्रत्येकी शंभर शब्दांत टिपा लिहा. (२०)**

१) खाप पंचायत
२) महिला आरक्षण विधेयक
३) मिनी बिगबँग
४) जनगणना २०११
५) धान्यापासून मद्यार्कनिर्मिती
६) प्रादेशिक भाषांचे भवितव्य
७) मराठी चित्रपटांतील नवे प्रवाह
८) वेगळ्या विदर्भाची मागणी

**प्रश्न ३) फ्रंटलाइन या नियतकालिकाच्या १६ ते २९ जानेवारी २०१० या अंकातील व्ही. व्यंकटेशन यांच्या लेखातील काही भाग पुढे दिला आहे. तो वाचून खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (एकूण गुण १०)**

...'माध्यमे न्यायालयाच्या भूमिकेत' या शब्दप्रयोगाचा नेमका अर्थ स्पष्ट करणे तसे सोपे नाही. कारण न्यायालये ज्याप्रमाणे खटले चालवितात, त्या प्रकारे माध्यमे खटला चालवत नाहीत. त्यामुळे त्या अर्थाने हा शब्दप्रयोग चुकीचा आहे. मात्र, माध्यमांमधून गुन्हेगाराला दिल्या जाणाऱ्या अवास्तव प्रसिद्धीमुळे निरपराध नागरिकांची बदनामी होऊ शकते किंवा दोषी व्यक्तींना निष्पक्ष न्यायाची हमी मिळत नाही किंवा त्यांना उचित शिक्षेपेक्षा खूप कठोर शिक्षा होऊ शकते.

कोणताही खटला निष्पक्षपणे चालविला जाणे हा त्या खटल्यातील आरोपीचा हक्क असतो. परंतु अटक झालेल्या एखाद्या व्यक्तीबद्दल माध्यमांनी हानीकारक बातम्या प्रसिद्ध केल्या, तर त्या हक्कावर गदा येते, असा मुद्दा या संदर्भात मांडण्यात येतो.

अटक झालेल्या व्यक्तीबद्दल हानीकारक लिखाण प्रसिद्ध झाले किंवा बातम्या प्रसारित झाल्या, तर फौजदारी प्रक्रियेमध्ये किंवा तपासकामात पूर्वग्रह निर्माण होतो, याविषयी गंभीर चिंता व्यक्त होत आहे. नंतर संबंधित व्यक्तीची सुटका झाली, तरी त्यासंबंधीचा पूर्वग्रह कायम राहतो.

‘‘माध्यमे न्यायालयाच्या भूमिकेत’ या विषयावर केंद्रीय विधी आयोगाने २००६ मध्ये आपला दोनशेवा अहवाल प्रसिद्ध केला. त्यात इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड यांसह अनेक देशांचे दाखले दिले आहेत. ‘मुद्रित किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी एखाद्या व्यक्तीला अटक झाल्यानंतर तिच्यावरील आधीच्या खटल्यांची माहिती देणे, ‘तपासादरम्यान आरोपीने गुन्ह्याची दिलेली कबुली दिली’ असे वृत्त देणे, तो (आरोपी) दोषी आहेच असे सूचित करणे किंवा त्याचे छायाचित्र प्रसिद्ध करणे यामुळेही फौजदारी खटल्यातील आरोपीला निष्पक्ष न्याय मिळण्याच्या प्रक्रियेत बाधा येते, असे मानले जाते,’ याकडे आयोगाने अहवालात लक्ष वेधले आहे.

‘एखाद्या फौजदारी खटल्यासंबंधी माहिती देण्याचे अनिर्बंध व अनियंत्रित असे स्वातंत्र्य माध्यमांना मिळाले आणि त्यांनी सर्वसामान्य जनता व न्यायप्रक्रियेत सहभागी व्यक्तींची मने (आरोपीविषयी) कलुषित केली; तसेच न्यायालयात खटला पूर्ण होण्याआधीच तो दोषी आहे, असे माध्यमांनी जाहीर केले, तर त्यातून आरोपीविरुद्ध गंभीर पूर्वग्रह निर्माण होऊ शकतो. संबंधित व्यक्तीला नंतर न्यायालयाने निर्दोष ठरवले, तरीसुद्धा ही व्यक्ती समाजात आपली प्रतिमा पुन्हा प्रस्थापित करू शकत नाही’, असेही आयोगाचे निरीक्षण आहे.

विधी आयोगाला वाटणारी ही चिंता रास्त आहे. परंतु, भारतातील फौजदारी न्यायप्रक्रिया वेळखाऊ आहे आणि तीत असणाऱ्या अनेक त्रुटी गुन्हेगारी कृत्याला बळी पडलेल्यापेक्षा आरोपीला झुकते माप देणाऱ्या आहेत. त्यामुळेच खटला निष्पक्षपणे चालण्याचा आरोपीचा हक्क आणि न्यायप्रक्रियेतील त्रुटी सर्वसामान्यांपर्यंत पोचवण्याचा माध्यमांचा व जनतेचा हक्क यांच्यात समतोल साधण्याची गरज आहे.

मात्र, ताज्या राठोड प्रकरणात माध्यमांकडून झालेली एक चूक दुर्लक्ष करण्यासारखी नाही. बहुतांश माध्यमांनी (काही अपवाद सोडले तर) भारतीय वृत्तपत्र परिषदेने आखून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमधील चौदाव्या नियमाचे उल्लंघन केले. त्या नियमानुसार ‘लैंगिक अत्याचारांसंबंधी गुन्ह्यांचे वार्तांकन करताना आणि जिथे महिलेच्या खासगी आयुष्याचा प्रश्न असतो अशा वेळी, अत्याचार झालेल्या व्यक्तीची ओळख उघड करू नये.’

----------

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

*(प्र. १ अनिवार्य आहे. प्र. २ ते ६मधील कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे द्या. शब्दमर्यादाः४०)*

१) वर दिलेल्या परिच्छेदासाठी दोन उचित मथळे द्या.
२) ‘माध्यमे न्यायालयाच्या भूमिकेत’ या शब्दप्रयोगाचे स्पष्टीकरण तुम्ही कसे कराल?
३) माध्यमांनी अमाप प्रसिद्धी दिल्याने काही फौजदारी खटले न्यायालयात पुन्हा सुरू झाले, याचे तुमच्या माहितीतील अलीकडचे किमान एक उदाहरण थोडक्यात स्पष्ट करा.
४) माध्यमांच्या वार्तांकनामुळे आरोपीला निष्पक्ष खटल्याचा अधिकार नाकारला जातो, असे तुम्हाला वाटते काय?
५) आरोपीचे हक्क आणि माध्यमे व जनता यांचे हक्क यात समतोल कसा साधता येईल, असे तुम्हाला वाटते?
६) लेखातील शेवटच्या परिच्छेदाचा अन्वयार्थ तुम्ही कसा लावाल?

****************